# ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८ दरम्यान पिकांच्या संभाव्य किंमतींचा अहवाल





## ऑगस्ट २०१८








**भारतीय कृषि विपणन माहिती व विश्लेषण केंद्र**

**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प**

प्लॉट एफ/इ/78, पहिला मजला, भूविकास बँक इमारत,

मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे - 411 037.

फोन : 020 24270315

वेबसाईट: http://macp.gov.in

टिप : सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमत विषयक अनुमान दर्शवितो. स्थानिक व आंतरराष्ट्रीय पातळीवर नैसर्गिक (उदा. वातावरणातील बदल किंवा पिकांवरील रोगराई )तसेच आर्थिक घटकांमुळे संभाव्य किंमतीमध्ये बदल होऊ शकतो. वाचकांनी सदर अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा, अन्यथा होणा-या नुकसानीस MACP प्रकल्प जबाबदार राहणार नाही.

## तूरीच्या संभाव्य किंमती - ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८

भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक तसेच उपभोक्ता देश आहे. अकोला बाजारपेठेतील तुरीच्या सरासरी किंमती रु.३,८०० ते ४,२००/- प्रति क्विंटल या दरम्यान राहीलेल्या दिसतात. भारत सरकारने प्रकाशित केलेल्या सुधारीत उत्पादन अहवाल (KMS २०१७-१८) नुसार तुरीचे उत्पादन ४१.८० लक्ष टन इतके हाते. मागील वर्षी ते ४७.८० लक्ष टन इतके होते. जास्त उत्पादनामुळे बाजरातील किंमती किमान आधारभूत किंमतीपेक्षा (MSP) कमी असतील.

भारत सरकारने दि.१५ मे २०१८ पर्यंत ८,५७,८७९ मेट्रिक टन इतकी तूर खरेदी केली आहे. बाजारातील तुरीच्या किंमतीवर प्रामुख्याने मागील वर्षीचा साठा, आयात आणि चालू वर्षीचे तूर उत्पादन या घटकांचा परिणाम होतो. शासनाने तूर निर्यातील चालना देण्याचा प्रयत्न केला त्याचबरोबर तूर आयातीवरही नियंत्रण आणले. डाळमिल धारकांना कोटा ठरवून दिला. सध्या तूर आयातीवर १०% आयात शुल्क आकारुन देखील किंमती किमान आधारभूत किंमतीपेक्षा (MSP) कमी आहेत.

वर्ष २०१८-१९ साठी तुरीची किमान आधारभूत किंमत ही रु.५,६७५/- प्रति क्विंटल इतकी आहे.

मागील दोन वर्षातील अकोला बाजारपेठेतील (ऑक्टोबर - डिसेंबर)दरम्यान तुरीच्या सरासरी किंमती पुढीलप्रमाणे :

| वर्ष | किंमत (रु. प्रति क्विंटल) |
|---|---|
| २०१७ | ५४८६/- |
| २०१८ | ३७८६/- |

बाजारातील सध्यस्थितीचा विचार करता वर्ष २०१८-१९ साठी तुरीचा उपलब्ध साठा ४० लक्ष टन असण्याची शक्यता आहे (मागील वर्षी तो ४२ लक्ष टन इतका होता). यावरुन **ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८** मध्ये तुरीच्या सरासरी किंमती **रु.३,९०० ते ४,३००/- प्रति क्विंटल** इतक्या असण्याची शक्यता आहे.

पुढील सुधारीत अहवाल सप्टेंबर २०१८ मध्ये प्रकाशित करण्यात येईल.

*****

## सोयाबीनच्या संभाव्य किंमती - ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८

सोयाबीन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पीक आहे. अमेरिका, ब्राझील, अॅर्जेटिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. कृषि मत्रांलयाच्या अहवालानुसार देशात दि.२४ ऑगस्ट २०१८ पर्यंत सोयाबीनची १११.२९ लाख हेक्टर वर पेरणी झाली आहे. मागील वर्षी १०४.८९ लाख हेक्टर वर पेरणी झाली होती. मागील वर्षीच्या तुलनेत सोयाबीनचा पेरा ६% नी वाढला आहे. अमेरिकन कृषि विभागाच्या (USDA, WASDE, August - २०१८), अहवालानुसार सन (२०१८ - १९), मध्ये जगात ३६७ दशलक्ष टन सोयाबीनचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तविली आहे. मागील वर्षी ३३६.७० दशलक्ष टन उत्पादन झाले होते. भारतात खरीप हंगाम (२०१८ - १९), मध्ये सोयाबीनचे १०.८० दशलक्ष टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तवली आहे. मागील वर्षी ८.०३ दशलक्ष टन उत्पादन झाले होते. मागील वर्षीच्या तुलनेत उत्पादनात २९% नी वाढ होईल असा अंदाज व्यक्त केला आहे.

माहे जुन ते ऑगस्ट २०१८ दरम्यान इंदूर बाजारात सोयाबीनच्या सरासरी किंमती रु.३४८७/- प्रती क्विंटल होत्या. खरीप हंगामासाठी (२०१८-१९) शासनाने रु.३३९९/- प्रति क्विंटल किमान आधारभुत किंमत (MSP) जाहीर केलेली आहे. १ जुन ते २२ ऑगस्ट २०१८ दरम्यान सोयाबीन लागवड क्षेत्रात सरासरी पाऊस पडला आहे. मागील दोन वर्षातील इंदूर बाजारातील सोयाबीनच्या ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे.

| वर्ष | किंमती रु. (प्रति क्विंटल) |
|---|---|
| २०१६ | ३०५६/- |
| २०१७ | २९३५/- |

दि. २८/०८/ २०१८ रोजीच्या इंदूर बाजारातील सोयाबीनच्या फ्युचर्स किंमती खालील प्रमाणे.

| महिना | किंमती रु. (प्रति क्विंटल) |
|---|---|
| ऑक्टोबर २०१८ | रु.३१८२/- |
| नोव्हेबर २०१८ | रु. ३१९९/- |
| डिसेंबर २०१८ | रु. ३२५३/- |
| जानेवारी २०१९ | रु. ३३१३/- |

मागील काही वर्षातील किंमतीचे अर्थमिती विश्लेषण व बाजारातील सद्यस्थिती, माहे **ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८** या कालावधीत इंदूर बाजारात सोयाबीनच्या संभाव्य किंमती **रु.३००० ते ३४००/- प्रति क्विंटल** या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सदर अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल. पुढील अंदाज अहवाल सप्टेंबर २०१८ मध्ये प्रकाशित केला जाईल.

* * * * *

## कापसाच्या संभाव्य किंमती - ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८

कापूस हे आंतरराष्टीय स्तरावरील महत्वाचे पीक आहे. भारत, चीन, अमेरिका ब्राझील व पाकिस्तान या प्रमुख कापूस उत्पादक देशामध्ये जगातील एकुण कापूस उत्पादनापैकी सुमारे ७५% उत्पादन होते. कृषि मत्रांलयाच्या अहवालानुसार देशात खरिप हंगामात (२०१८-१९), दि.२४ ऑगस्ट २०१८ पर्यंत कापसाची ११६.८५ लाख हेक्टर वर पेरणी झाली आहे. मागील वर्षी ११९.६७ लाख हेक्टरवर पेरणी झाली होती. मागील वर्षीच्या तुलनेत कापसाचा पेरा २.३६% नी कमी झाला आहे. अमेरिकन कृषि विभागाच्या (USDA, WASDE, August - २०१८), अहवालानुसार, भारतात खरीप हंगाम (२०१८ - १९), मध्ये कापसाचे ३६५ लाख गाठी कापसाचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तवली आहे. मागील वर्षी ३७१ लाख गाठीचे उत्पादन झाले होते.

माहे जुन ते ऑगस्ट २०१८ या कालावधीत राजकोट (गुजरात) बाजारात कापसाच्या सरासरी किंमती रु.५८४०/- प्रति क्विंटल होत्या. शासनाने खरीप हंगाम (२०१८ - १९) साठीची किमान आधारभूत किंमत मध्यम धाग्याच्या कापसासाठी रु. ५१३०/- प्रति क्विंटल आहे. व लांब धाग्यासाठी रु.५४५०/- प्रति क्विंटल जाहिर केलेली आहे. १ जुन ते २२ ऑगस्ट २०१८ या दरम्यान सोयाबीन सागवड क्षेत्रात सरासरी पाऊस पडला आहे. मागील दोन वर्षामधील राजकोट बाजारातील कापसाच्या ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे.

| वर्ष | किंमती रु. (प्रति क्विंटल) |
|---|---|
| २०१६ | ५०८४/- |
| २०१७ | ४६८५/- |

दि. २८ ऑगस्ट २०१८ रोजीच्या राजकोट बाजारातील MCX मधील कापसाच्या फ्युचर्स किंमती खालील प्रमाणे.

| महिना | किंमती रु. (प्रति १७० किलोची गाठी) |
|---|---|
| ऑक्टोबर २०१८ | रु.२३,१९० /- |
| नोव्हेबर २०१८ | रु. २२,७४०/- |
| डिसेंबर २०१८ | रु. २२,७७०/- |
| जानेवारी २०१९ | रु. २२,७४०/- |

मागील काही वर्षातील किंमतीचे अर्थमिती विश्लेषण व बाजारातील सद्यस्थिती, माहे **ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८** या कालावधीत राजकोट बाजारात कापसाच्या संभाव्य किंमती **रु.४८०० ते ५२००/- प्रति क्विंटल** या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सदर अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल. पुढील अंदाज अहवाल सप्टेंबर २०१८ मध्ये प्रकाशित केला जाईल.

* * * * *

## मक्याच्या संभाव्य किंमती - ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८

भारत देशात मका पिकाचे ७३% उत्पादन खरीप हंगामात होते व उर्वरीत रब्बी हंगामात होते. मक्याच्या किंमती वर गुणवत्ता, आर्द्रता, पुरवठा व मागणी याचा परिणाम होतो. मागील १ महिन्यामध्ये मक्याची सरासरी किंमत रु. १,२३०/- प्रति क्विंटल इतकी आहे. त्याचबरोबर मक्याच्या वायदे बाजारातील सध्याच्या किंमती वाढता कल दर्शवित आहेत.

भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार वर्ष २०१७-१८ मध्ये उत्पादन २६. ८० मिलीयन टन इतके झालेले आहे. मक्याच्या उत्पादनात मागील वर्षीच्या तुलनेत १९% वाढ झालेली दिसते.

सन २०१८- १९ हंगामासाठी किमान आधारभुत किमंत रु. १,७०० इतकी आहे.

मागील दोन वर्षातील मक्याच्या निझामाबाद बाजारातील मक्याच्या ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यात सरासरी किंमती पुढील प्रमाणे.

| वर्ष | किंमती (रु. प्रति क्विंटल) |
|---|---|
| २०१६ | १४९६/- |
| २०१७ | १३६०/- |

२३-८-२०१८ रोजी वायदे बाजारातील मक्याच्या किंमती पुढील प्रमाणे.

| महिना | किंमती (रु. प्रति क्विंटल) |
|---|---|
| १९-०९-२०१८ | १३२९ |
| १६-१०-२०१८ | १३६० |
| २०-११-२०१८ | १३९१ |
| २०-१२-२०१८ | १४२२ |

मागील १२ वर्षातील मक्याच्या बाजारभावाच्याकिंमतीचे अर्थमिती विश्लेषण व बाजारातील सद्यस्थिती वरुन **ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८** महिन्यात मक्याच्या संभाव्य सरासरी किंमती **रु. १३०० ते रु. १६०० प्रति क्विंटल** या दरम्यान राहतील. पुढील सुधारीत अहवाल सप्टेंबर २०१८ मध्ये प्रकाशित करण्यात येईल.

* * * * *

## कांद्याचा संभाव्य किंमती - माहे सप्टेंबर २०१८

कांदा हे अतिशय महत्वाचे व्यावसायिक भाजीपाला पिक आहे. कांदा अतिशय नाशवंत असल्यामुळे किंमतीं मध्ये खुप अस्थिरता जाणवते. तसेच माहे ऑगस्ट २०१८ दरम्यान लासलगाव बाजारातील कांद्याच्या सरासरी किंमती रु. ९६१ प्रति क्विंटल होत्या.

FAO (२०१४) च्या आकडेवारीनुसार जागतिक कांदा उत्पादनात चीन नंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. तसेच एकुण जागतिक कांदा उत्पादनात २०% वाटा भारताचा आहे. भारतात महाराष्ट्र (२८%), हे प्रमुख कांदा उत्पादक राज्य असुन त्या नंतर कर्नाटक (१७%) व मध्य प्रदेश (१५%) या राज्याचा क्रमांक लागतो. भारतातून कांद्याची निर्यात मुख्यतः बांग्लादेश, मलेशिया, संयुक्त अरब अमिरात व श्रीलंका या देशामध्ये केली जाते.

राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या सन २०१७ -१८ च्या तृत्रीय अंदाजानुसार भारतातील कांद्याचे क्षेत्र व उत्पादन अनुक्रमे सुमारे १३. १५ लाख हेक्टर व २२ दशलक्ष टन आहे. तसेच नाशिक, पुणे, सातारा, जळगांव, धुळे, अहमदनगर, नागपूर व सोलापूर ही महाराष्ट्रातील प्रमुख कांदा उत्पादक जिल्हे आहेत.

मागील १२ वर्षांतील कांद्याच्या किंमतींच्या विश्लेषण व बाजारातील सध्यस्थिती वरुन, **सप्टेंबर २०१८** महिन्यातील लासलगांव बाजारातील कांद्याच्या संभाव्य सरासरी किंमती **रु. ७०० ते रु. ९०० प्रति क्विंटल** या दरम्यान राहतील असे अपेक्षित आहे. असा अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल.

*****

## टोमॅटोच्या संभाव्य किंमती माहे सप्टेंबर २०१८

टोमॅटो हे अतिशय महत्वाचे व्यावसायिक व आहारातील भाजीपाला पिक आहे. व्यावसायिक दृष्ट्या टोमॅटो हे कमी कालावधीचे, जास्त उत्पन्न मिळवून देणारे व किफायतशीर आहे, त्याचबरोबर ते अत्यंत नाशवंत पिक आहे. ऑगस्ट २०१८ दरम्यान पुणे बाजारात टोमॅटोच्या सरासरी किंमती रुपये ८९५ प्रति क्विंटल होत्या.

FAO (२०१४) च्या आकडेवारी नुसार, जागतिक टोमॅटो उत्पादनात चीन नंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. तसेच एकुण जागतिक टोमॅटो उत्पादनात भारताचा ८% वाटा आहे. राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या सन २०१४-१५ च्या आकडेवारीनुसार, भारतात महाराष्ट्र राज्य हे टोमॅटो उत्पादनात दहाव्या क्रमांकावर आहे. (तसेच मध्यप्रदेश, (१३%), कर्नाटक (१२%), आंध्र प्रदेश (९%), ओडिसा (८.४%) व गुजरात (७.७%) या राज्याचा क्रम लागतो.) नाशिक, पुणे, सातारा, अहमदनगर, नागपूर व सांगली ही महाराष्ट्रातील प्रमुख टोमॅटो उत्पादक जिल्हे आहेत.

राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या सन २०१७ -१८ च्या तृतीय अंदाजानुसार भारतातील टोमॅटोचे क्षेत्र व उत्पादन अनुक्रमे सुमारे ७.८६ लाख हेक्टर व १९ दशलक्ष टन आहे.

मागील १२ वर्षांतील किंमतीच्या विश्लेषण, बाजार सर्वेक्षण व बाजारातील सध्यस्थिती वरुन, **सप्टेंबर २०१८** महिन्यात पुणे बाजारातील टोमॅटोच्या संभाव्य सरासरी किंमती **रु. ७०० ते रु.९०० प्रति क्विंटल** या दरम्यान राहतील, असे अपेक्षित आहे. असा अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल.

*****

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**प्रकल्प संचालक**

**भारतीय कृषि विपणन माहिती व विश्लेषण केंद्र**

**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प**

प्लॉट एफ/इ/७८, पहिला मजला, भूविकास बँक इमारत, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७.

फोन : ०२० २४२७०३१५, वेबसाईट : http://macp.gov.in इ-मेल : macpamis@gmail.com